# सावलीचा कथा विशेषांक–२००६

या वर्षी आम्ही प्रथमच **सावलीचा कथा विशेषांक** गणेशोत्सवाचे वेळी (ऑगस्ट २००६) प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे. या अंकाची मध्यवर्ती कल्पना अशी आहे.

सुनामी, कट्रीना, रीटा अशा अनेक नैसर्गीक उत्पातांमुळे जगांतील अनेकांच्या जीवनांत बदल झाले. कित्येकांची आयष्ये मुळापासून उध्वस्त झाली . आतंक्यवाद्यांनी न्यूयॉर्क मध्ये केलेला 9/11 चा अमानूष हल्ला, अफगाणीस्तान, इराक येथील युध्दांमुळे होत असलेली मनुष्यहानी आणि भारताच्या सरहद्दीवर होणाऱ्या आतंकवाद्यांच्या कारवायांमुळे अनेकांच्या जीवनाची राखरांगोळी झाली . सहाजिकच अशा भयंकर घटनांमुळे मनुष्याच्या आयुष्यांत आमुलाग्र बदल होणे अपरिहार्य आहे. पण बारिकसारिक घटनांमुळे कित्येकांची आयुष्ये बदललेली आपण सर्रास पहातो. त्यांत प्रेमभंग, प्रेमसाफल्य, मातृत्व, अचानक धनलाभ, बेकारी, दिवाळखोरी, अपघात, मृत्यू अशा एक ना अनेक कारणांमुळे अनेकांच्या आयुष्याच्या चाकोरीत बदल झालेला आपण पहातो.

आता हेच पहा ना....वाचाळ म्हणून लौकिक पावलेला आमचा एक मित्र नानू शिंकरे, माधुरीच्या (नेने नव्हे) प्रेमांत पडला आणि त्याचे तोंड बंद करायला बिचाऱ्या माधुरीला मुक्यांचा मारा करावा लागला आणि नानू गुदमरला अस ऐकिवांत आहे. नानूच्या आयुष्यांतला पहिला " गचका "-Turning Point हा असा ! गंभीर तसाच विनोदी सुध्दां !

तर म्हणून या वेळचा अंक "Turning Point" या मध्यवर्ती सूत्रावर आधारीत आहे. महाराष्ट्रांतील ख्यातमान लेखक, प्रा.गंगाधरराव गाडगीळ, गिरीजा कीर, बाळ गाडगीळ, विजय कापडी, अनुराधा औरंगाबादकर, विजया राजाध्यक्ष, प्रमोदिनी वडके–कवळे यांच्या अप्रतिम कथा ; तसेच वृत्तपत्र क्षेत्रांतील कुमार केतकर, भारतकुमार राऊत, महेश आफळे, स्मिता राजवाडे, उमाजी केळुस्कर, ; डॉक्टरी पेशांतील डॉ.ह.वी.सरदेसाई, डॉ.फणसळकर ; सिनेमा–नाट्य क्षेत्रांतील रीमा लागू, श्रीकांत मोघे ; शिक्षण–समाजसेवा क्षेत्रांतील सुभाष देशमूख व सुषमा देशमूख या सर्वांचे अनुभवसिधद लेख.; तसेच अमेरिकेंतील दर्जेदार लेखक डॉ.प्रकाश लोथे, ललिता गंडभीर, अनुराधा गानू, विजय पाठारे, संध्या कर्णिक, डॉ.शिरीष किर्तने, जया हुपरीकर, विद्या हर्डिकर–सप्रे, दिवाकर कारखानीस, उषा हरदास; लंडनचे डॉ.मनोज प्रधान इत्यादीच्याा दर्जेदार ललित साहित्याने अंक अत्यंत वाचनीय झालेला आहे.

जागतीक किर्तीचे चित्रकार जॉन फर्नांडिस यांनी सावलीचे आकर्षक आणि मनोज्ञ मुखपृष्ठ चितारले आहे.

मागील वर्षाप्रमाणेच या वर्षीच्या अंकाचे सहर्ष स्वागत होईल अशी आशा आहे. अंक अनेक मराठी मंडळांच्या गणेशोत्सवाच्या वेळी उपलब्ध असेल. आपण आपली मागणी खालील पत्यावर नोंदवू शकता.


दिवाकर कारखानीस<br>
संपादक– सावली<br>
104 Grand Falls Ct,<br>
Dickinson, TX 77539<br>
(281) 534-9733